८३३ P-554 O/C

# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)
मुख्य कार्यालय : चौथा मजला, काकडे बीझ आयकॉन,
ई-स्क्वेअर जवळ, पुणे विद्यापीठ रोड, अशोक नगर,
शिवाजी नगर, पुणे - ४११०१६.
दूरध्वनी क्रमांक : (का.) : ०२०-२५५७७९९९, २५५७७९००
ई-मेल : srapune@yahoo.in वेबसाईट : www.srapune.gov.in

झो. पु. प्रा निश्चयेन परिवर्तनम्। झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण पुणे व पिंपरी चिंचवड

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. झोपुप्रा/तां-३/भोप्र/मा.क्र.१९७/५५८/२०२२ दि. ०५/०५/२०२२.

## अंतिम भोगवटा प्रमाणपत्र

वाचा - १) प्रथम बांधकाम परवानगी (मूळ CC) जा.क्र.१३०३/२०१७ दि. ०३/०८/२०१७
२) सुधारित बांधकाम परवानगी जा.क्र.४३७४/२०१९, दि. ०५/०८/२०१९.
३) सुधारित बांधकाम परवानगी जा.क्र.२२०६/२०२१, दि. १०/१२/२०२१.
४) विकसक मे. पुर्णायू एंटरप्रायझेस यांचे दि.१७/०३/२०२२ रोजीचे पत्र.

Slum Rehabilitation Authority Technical Department APPROVED Pune-Pimpri-Chinchwad Area

---

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ कलम ४५ प्रमाणे **सि.स.नं. ३२८ निगडे वस्ती, स.नं. ४७/३/१ब, घोरपडी गाव, पुणे.** येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमधील इमारतीस या कार्यालयाकडून जा.क्र.झोपुप्रा / तां.३ / २२०६ / २०२१ दि.१०/१२/२०२१ अन्वये बांधकाम परवानगी देणेत आली आहे. सदरील बांधकाम परवानगी प्रमाणे इमारतीमधील काम पूर्ण झाल्याने, सदर इमारतीमधील सदनिका/गाळे इ.साठी भोगवटा पत्र मिळण्याबाबत प्रकल्पाचे विकसक मे. पुर्णायू एंटरप्रायझेस यांनी उपरोक्त वाचा मध्ये नमूद केले नुसार विनंती अर्ज केलेवरुन खालीलप्रमाणे तपशीलानुसार इमारतीसाठी एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०२० चे नियमन क्र.२.११ अन्वये अंतिम भोगवटा प्रमाणपत्र खालील प्रमाणे देणेत येत आहे.

(पुनर्वसन इमारत)

| अ. क्र. | मजले | सदनिका/ दुकान क्र. (पुनर्वसन घटक) | सदनिका/ दुकान क्र. (पुनर्वसन घटक) | सदनिका/ दुकान क्र. (पुनर्वसन घटक) | सदनिका/ दुकान क्र. (पुनर्वसन घटक) | एकूण सदनिका/दुकाने |
|---|---|---|---|---|---|---|
| | | नकाशा मंजूरीनुसार | | प्रत्यक्षात स्थळपाहणी दरम्यान | | |
| | | पुनर्वसन घटक | विक्री घटक | *पुनर्वसन घटक* | विक्री घटक | |
| १) | ग्राउंड फ्लोअर | सोसायटी ऑफिस+ underground water tank+parking | -- | सोसायटी ऑफिस+ underground water tank+parking | -- | सोसायटी ऑफिस+ underground water tank+parking |

P-543

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २) | पहिला | सदनिका क्र. १०३ ते १०६ +वेलफेअर सेंटर+ बालवाडी | -- | सदनिका क्र. १०३ ते १०६ +वेलफेअर सेंटर+ बालवाडी | -- | ०४ सदनिका +वेलफेअर सेंटर+ बालवाडी |
| ३) | दुसरा | सदनिका क्र. २०१ ते २०६. | -- | सदनिका क्र. २०१ ते २०६. | -- | ०६ सदनिका |
| ४) | तिसरा | सदनिका क्र. ३०१ ते ३०६. | -- | सदनिका क्र. ३०१ ते ३०६. | -- | ०६ सदनिका |
| ५) | चौथा | सदनिका क्र. ४०२ ते ४०६. | सदनिका क्र. ४०१. | सदनिका क्र. ४०२ ते ४०६. | सदनिका क्र. ४०१. | ०६ सदनिका |
| ६) | पाचवा | सदनिका क्र. ५०१ ते ५०६. | -- | सदनिका क्र. ५०१ ते ५०६. | -- | ०६ सदनिका |
| ७) | सहावा | सदनिका क्र. ६०१ ते ६०६. | -- | सदनिका क्र. ६०१ ते ६०६. | -- | ०६ सदनिका |
| ८) | सातवा | सदनिका क्र. ७०१ ते ७०६. | -- | सदनिका क्र. ७०१ ते ७०६. | -- | ०६ सदनिका |
| ९) | आठवा | सदनिका क्र. ८०१ ते ८०५ + refuge area. | -- | सदनिका क्र. ८०१ ते ८०५ + refuge area. | -- | ०५ सदनिका + refuge area. |
| १०) | नववा | सदनिका क्र. ९०१ ते ९०६. | -- | सदनिका क्र. ९०१ ते ९०६. | -- | ०६ सदनिका |
| ११) | दहावा | सदनिका क्र. १००१ ते १००६. | -- | सदनिका क्र. १००१ ते १००६. | -- | ०६ सदनिका |
| १२) | अकरावा | सदनिका क्र. ११०१ ते ११०६. | -- | सदनिका क्र. ११०१ ते ११०६. | -- | ०६ सदनिका |
| १३) | बारावा | सदनिका क्र. १२०१ ते १२०६. | -- | सदनिका क्र. १२०१ ते १२०६.. | -- | ०६ सदनिका |
| | एकूण | ६८ | ०१ | ६८ | ०१ | ६९ सदनिका |

Slum Rehabilitation Authority ★ Technical Department ★ APPROVED ★ Pune-Pimpri-Chinchwad Area

(पुनर्वसन इमारत)

i) पुनर्वसन घटक :- ६८ सदनिका + ०१ बालवाडी + ०१ वेलफेअर सेंटर + सोसायटी ऑफिस + टॉयलेट

ii) विक्री घटक :- ०१ सदनिका

प्रस्तुत प्रकरणी भोगवटा देणेकामी खालील नमूद अटी व शर्तीस अधीन राहून अंतिम भोगवटा प्रमाणपत्र देणेत येत आहे.

अटी:-

१) प्रस्तुत अंतिम भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झालेनंतर सदर इमारतीमध्ये वा भूखंडामध्ये केलेले कोणतेही बांधकाम अनाधिकृत समजण्यात येईल आणि त्याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६चे कलम ५२ ते ५६ नुसार जरूर ती कार्यवाही करण्यात येईल.

२) अंतिम भोगवटा प्रमाणपत्रासाठी सादर केलेली कागदपत्रे चुकीची अथवा दिशाभूल करणारी असल्याचे भविष्यात कोणत्याही वेळेस आढळल्यास दिलेले अंतिम भोगवटा प्रमाणपत्र आपोआप रद्द समजण्यात येईल.

३) प्रकरणी भविष्यात कोणतीही शासकीय देणी / येणे देय असल्याबाबत आढळून आल्यास अगर विविध देय शुल्कांच्या परिगणनेमध्ये तफावत आढळून आल्यास त्याप्रमाणे फरकाची रक्कम भरणे विकसकावर बंधनकारक राहील.

४) स्थानिक संस्था कराबाबत व उपकराबाबत शासन धोरण व नियमानुसार आवश्यक ती पूर्तता करणे व सर्व अटी / शर्तींचे पालन करणे विकसकांवर बंधनकारक राहील.

५) इमारतीच्या उत्तर व पुर्व बाजूंनी असणारे सामासिक अंतराचे क्षेत्र (All Marginal / open space) कोणत्याही अडथळ्याशिवाय पुर्णपणे खुले आहे.

६) प्रकल्पाअंतर्गत योजना क्षेत्रातील सार्वजनिक रस्त्याअंतर्गत क्षेत्र सर्व रहिवाशांच्या सार्वजनिक वापराकरिता निरंतर उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे.

७) विषयांकित योजना रस्तारूंदीकरणाखालील / आरक्षणाखालील क्षेत्र असल्यास म.न.पा. पुणे यांचेकडे हस्तांतरीत करून तसे, उर्वरित टी.डी.आर. मागणीपूर्वी, या कार्यालयास अवगत करावे.

८) प्रस्तुत गृहनिर्माण प्रकल्पाकरीता सक्षम प्राधिकाऱ्याने पाण्याचा पुरवठा न केल्यास या गृहनिर्माण प्रकल्पातील सदनिका हस्तांतरण करणेपूर्वी पाण्याची आवश्यक ती पुर्तता स्वखर्चाने करणे विकसकावर बंधनकारक राहील.

९) सदर झोपडपट्टी योजनेतील पुनर्वसन सदनिकांचे वाटप, भोगवटापत्र प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांमध्ये सोडतपद्धतीने वितरीत करून घेणे आवश्यक आहे.

Slum Rehabilitation Authority ★ Pune-Pimpri-Chinchwad Area ★ Technical Department APPROVED

सहायक संचालक नगररचना
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत :- १) मे. पुर्णायू एंटरप्रायझेस,

फ्लॅट नं. ७, कृष्णांजली बिल्डींग, कृष्णा पथ, लॉ कॉलेज रोड समोर, पुणे ४११००४.

२) तहसिलदार,ताबा विभाग, झोपुप्रा, पुणे, यांना माहितीस्तव अग्रेषित.

३) संगणक अधिकारी, झोपुप्रा, पुणे, यांना संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यासाठी अग्रेषित.